# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### परिपत्रक

विषय : बी.ए.भाग १, बी. कॉम. भाग १, एम.ए. भाग २, एम.कॉम भाग २ व एम.एस्सी (गणित) भाग २ या पाठयक्रमाच्या स्वयंअध्ययन साहित्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२४ – २०२५ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार बी.ए.भाग १, बी. कॉम. भाग १, एम.ए. भाग २, एम.कॉम भाग २ व एम.एस्सी (गणित) भाग २ या पाठयक्रमांचे अभ्यासक्रम सुधारित करण्यात आले आहेत. सदर सुधारित अभ्यासक्रमाप्रमाणे नव्याने तयार करण्यात आलेले व छपाई होवून तयार असलेले स्वयंअध्ययन साहित्य विद्यार्थ्यांना वितरीत करणेसाठी आपणास उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच काही विषयाचे स्वयं अध्ययन साहित्य विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांनी उपरोक्त स्वयं अध्ययन साहित्याच्या प्रतीची (प्रिंट) मागणी केल्यास आपल्या अभ्यास केंद्रामार्फत सदरच्या प्रिंट विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात व त्याबाबतचे देयके दूरशिक्षण केंद्रास सादर करावीत सदरचे देयक आपणास दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून आदा केली जातील.

Bhinde

उपकुलसचिव

संदर्भ : शिवाजी वि/दूशिके/२०२४–२०२५/128

दिनांक : 0 6 MAR 2025

प्रति,

१. मा.केंद्रप्रमुख/केंद्र समन्वयक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची सर्व अभ्यास केंद्रे

2. मा समन्वयक, सातारा, सांगली व कोल्हापूर विभागीय केंद्र, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर